जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
पुढारी



कागल : 'मॅक'च्या वार्षिक सभेत विद्यापीठ व 'मॅक' सामंजस्य करार प्रसंगी डॉ. डी. टी. शिर्के, 'मॅक'चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, विठ्ठल पाटील, सुरेश क्षीरसागर.

# विद्यापीठ उद्योजकांच्या प्रगतीचा मार्ग सुकर करेल : कुलगुरू डॉ. शिर्के

## शिवाजी विद्यापीठ - 'मॅक'मध्ये सामंजस्य करार

**कसबा सांगाव : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ ही ज्ञानाची खाण आहे. उद्योग क्षेत्राला भरारी देण्यासाठी दोघांनी एकत्रित काम केल्यास विद्यापीठ उद्योजकांच्या प्रगतीचा मार्ग सुकर करेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल हातकणंगले (मॅक) च्या १७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी 'मॅक'चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे होते.

'विद्यापीठ आणि उद्योगाचे सहकार्य संधी आणि आव्हाने' या विषयावर बोलताना ते म्हणाले, कोल्हापूरच्या उद्योग क्षेत्रात कल्पकता आहे. उद्योजकांचे यश हे जिद्द आणि कष्टाच्या जोरावरचे आहे. जागतिक बाजारपेठेत काम करताना उद्योजकांना भाषा आणि तंत्रज्ञानाची पुरेशी माहिती विद्यापीठाकडून सहज उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी 'मॅक'व विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. बेकरी उद्योजकांसाठी काम करणाऱ्या कोणार्क बेकरी ओव्हन्स व विद्यापीठ यांच्यामध्येही हा करार यावेळी पार पडला. अध्यक्षीय भाषणात धोत्रे यांनी 'मॅक'च्या कामाचा आढावा घेतला. उपाध्यक्ष मोहन कुशिरे, विठ्ठल पाटील, सुरेश क्षीरसागर, बाळासाहेब धुळगडे, मुबारक शेख, संजय जोशी, संजय पेंडसे, सेक्रेटरी शंतनू गायकवाड, 'स्मक'चे अध्यक्ष सुरेंद्र जैन, 'गोशिमा'चे अध्यक्ष स्वरूप कदम, 'स्लीमा'चे अध्यक्ष महेश दाते, मान्यवर, उद्योजक उपस्थित होते. सुरेश क्षीरसागर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

0 3 OCT 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठाच्या ४४ वा मध्यवर्ती युवा महोत्सवाची आजरा महाविद्यालयात जल्लोष अन् उत्साहात सांगता

# युवा महोत्सवांतून मिळतेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ

**प्रतिनिधी**

आजरा

विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्यावतीने प्रत्येक वर्षी जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. युवा महोत्सव कलाकारांसाठी टॉनिक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाची आजरा महाविद्यालयात मंगळवारी सांगता झाली. या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ज्येष्ठ अभिनेते डॉ. शरद भुथाडीया प्रमुख पाहुणे म्हणून तर जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी, अभिनेत्री वंदना देसाई उर्फ रावी किशोर यांची प्रमुख उपस्थिती होती.



आजरा : शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सादळे यांनी प्रास्ताविकात जनता एज्युकेशन सोसायटीच्या वाटचालीचा आढावा घेतला. शिवाजी विद्यापीठाने ४४ वा मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या आयोजनाची दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी जनता एज्युकेशन सोसायटीसह आण्णाभाऊ संस्था समूहातील सर्वच संस्थांनी मदत केल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या महोत्सवानंतर आता यातील विजेत्यांना याहीपेक्षा मोठ्या व्यासपीठावर काम करण्याची संधी मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

युवा महोत्सवातील सहभागी स्पर्धकांच्यावतीने विद्यार्थिनी शुभांगी दुबे व संघ व्यवस्थापकांच्यावतीने मनिषा नायकवाडी यांनी आजरा महाविद्यालयाने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. येथे कोणत्याच गोष्टीची कमतरता भासली नसल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थी विकास विभागाचे प्र. संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी दोन दिवस चाललेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा आढावा घेतला. आजरा महाविद्यालयाने अतिशय नेटकेपणाने महोत्सव पार पाडल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ अभिनेते डॉ. शरद भुथाडीया म्हणाले, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्यासाठी अशा प्रकारचे युवा महोत्सव आयोजित केले जातात. माणसाच्या जीवनात कला अपरिहार्य आहे. या कला सादर करण्याचं, विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी मध्यवर्ती युवा महोत्सव हे महत्वाचं व्यासपीठ असल्याचे त्यांनी सांगितले.

गेली ४४ वर्षे या युवा महोत्सवाची परंपरा शिवाजी विद्यापीठानं कायम जपली असल्याबद्दल विद्यापीठाचेही त्यांनी कौतुक केले. कला सादर करणाऱ्या आणि कला जोपासण्यासाठी परीश्रम घेणाऱ्या शिक्षकांचेही त्यांनी कौतुक केले.

डॉ. अशोक बाचूळकर यांनी सूत्रसंचालन केले.कार्यालयीन अधिक्षक योगेश पाटील यांनी आभार मानले. या युवा महोत्सवाच्या सांगता प्रसंगी जनता एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष विलास नाईक, सचिव रमेश कुरुणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे, संचालक विजयकुमार पाटील, माजी नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी, अनिकेत चराटी, विजय बांदेकर, के. व्ही. येसणे, शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. आर. डी. ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर यांच्यासह जनता एज्युकेशन सोसायटीचे सर्व संचालक, आण्णाभाऊ संस्था समूहातील विविध संस्थांचे संचालक, कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून या युवा महोत्सवात सहभागी झालेले विविध कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, संघ व्यवस्थापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
सकाळ

# कवितेत राष्ट्र परिवर्तनाची ताकद

## डॉ. व्ही. एन. शिंदे : 'निसर्गात रमताना'चे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २ : 'कवितेत राष्ट्र परिवर्तनाची ताकद असते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

कवी चंद्रकांत डोंगरे लिखित 'निसर्गात रमताना' चारोळी संग्रहाचे प्रकाशन शाहू स्मारक भवन येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, 'कवीला निसर्गाची भाषा वाचता आली पाहिजे. यातून मानवी भावसबंध प्रकट होत असतो. अचूक निरीक्षणात ज्या कविता निर्माण होतात, अशा कवितेतून राष्ट्र परिवर्तनाची ताकद निर्माण होत असते.'

ज्येष्ठ कवी मोहन कवठेकर म्हणाले, 'पुस्तकातील चारोळ्या अल्पाक्षरी असल्यातरी त्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या आहेत. चारोळीत ओघवती भाषाशैली, उच्चारासाठी सोपी, सर्व वयोगटाला समजेल -उमजेल अशी सोपी भाषा आहे.' शर्मिष्ठा ताशी यांनीही मनोगत व्यक्त केले. डोंगरे यांनी लिखाणामागची प्रेरणा आणि भूमिका सांगितली. वाचनकट्टा संस्थेचे अध्यक्ष युवराज कदम यांनी प्रास्ताविक केले. काही प्रातिनिधिक कवितांचे वाचन अभिनेत्री श्रुतकिर्ती सावंत, ऋतुजा डोंगरे यांनी केले. यावेळी डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. दादासाहेब मोरे, लेखिका विमल मोरे, शिये येथील करुणालय बालगृहाचे आनंद बनसोडे, डॉ. संजय लट्ठे, सूर्यकांत डोंगरे, विक्रांत पाटील, पंढरी डोंगरे आदी उपस्थित होत. वैदेही जोशी यांनी सूत्रसंचालन केले. ऋषिप्रसाद डोंगरे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शाहू स्मारक भवन येथे 'निसर्गात रमताना' चारोळी संग्रहाचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.

0 3 OCT 2024
लोकमत

# विद्यापीठात गांधी, शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी शहादा नंदुरबार येथील गांधीवादी साहित्यिक डॉ. विश्वास पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. धनंजय सुतार, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. चंद्रकांत लंगरे, दौलत नांद्रे उपस्थित होते.

## गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम

गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे 'सेवा ही स्वच्छता सप्ताह' अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविली. केवळ विद्यापीठ परिसरच नव्हे, तर विद्यापीठ परिसराबाहेरील सायबर चौकापर्यंतचा परिसर मोहिमेंतर्गत स्वच्छ केला. प्रत्येक अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह प्रशासकीय विभागातील कर्मचाऱ्यांनी त्या-त्या परिसराची स्वच्छता केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५००हून अधिक स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक एकपासून ते सायबर चौकापर्यंतचा कम्पाउंड भिंतीलगतचा संपूर्ण परिसर कचरा व प्लास्टिकपासून मुक्त केला. मोहिमेमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले यांनीही पूर्णवेळ सहभाग नोंदविला. यावेळी प्रभातफेरी काढली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 OCT 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. साहित्यिक डॉ. विश्वास पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. शिवलिंगप्पा सपली, ग्रंथपाल डॉ. धनंजय सुतार, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. चंद्रकांत लंगरे, दौलत नांद्रे विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ परिसरात स्वच्छता

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे 'सेवा ही स्वच्छता सप्ताह' अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबविली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरासह सायबर चौकापर्यंत स्वच्छ करण्यात आली. प्रत्येक अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह प्रशासकीय विभागातील कर्मचाऱ्यांनी संबंधित परिसराची स्वच्छता केली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५०० हून अधिक स्वयंसेवक, विद्यार्थ्यांनी परिसर कचरा, प्लास्टिकमुक्त केला. मोहिमेमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. विद्यापीठामधील स्वच्छता मोहिमेदरम्यान प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण नगण्य आढळले. विद्यापीठात सर्वच घटकांत स्वच्छतेचा संस्कार रुजल्याची प्रचिती त्यातून आली. "विद्यार्थ्यांसह सर्वच घटकांनी यापुढील काळातही आपला विद्यापीठ परिसर असाच स्वच्छ आणि विशेषतः प्लास्टिकमुक्त राहण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'सेवा ही स्वच्छता' सप्ताह अभियान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे 'सेवा ही स्वच्छता' सप्ताह अभियान राबवण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ परिसर तसेच विद्यापीठ परिसराबाहेरील सायबर चौकापर्यंतचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५०० हून अधिक स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक एकपासून ते सायबर चौकापर्यंतचा कम्पाऊंड भिंतीलगतचा संपूर्ण परिसर कचरा व प्लास्टिकपासून मुक्त केला. फूटपाथ व भिंतीच्या दरम्यान उगवलेली झाडेझुडपे काढून तेथीलही स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांसह सर्वच घटकांनी यापुढील काळातही आपल्या विद्यापीठाचा परिसर असाच स्वच्छ आणि विशेषतः प्लास्टिकमुक्त राहण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
पुढारी

# यशस्वी पत्रकारितेसाठी कायद्याचे ज्ञान आवश्यक

## प्रा. डॉ. शिवाजी जाधव; सांगलीत डिजिटल माध्यमावर कार्यशाळा

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

चांगल्या पत्रकारितेसाठी मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारांना कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे, तरच त्यांची पत्रकारिता यशस्वी होईल. यासाठी कायद्याचे ज्ञान अवगत करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या सभागृहात बुधवारी मराठी पत्रकार परिषदेच्या सांगली जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि डिजिटल मीडिया परिषद व शिवाजी विद्यापीठ पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने कार्यशाळा झाली. 'डिजिटल माध्यमे व कायदे' असा कार्यशाळेचा विषय होता. यावेळी डॉ. जाधव बोलत होते.

डिजिटल मीडिया संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले, डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी शोधवार्ता करून नेहमी वेगळा विषय हाताळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपली बदनामी होणार नाही, यासाठी नेहमी दक्ष राहिले पाहिजे.

यावेळी पत्रकार हणमंत पाटील, डिजिटल मीडिया पत्रकार परिषदेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय माळी आदींनी मनोगत व्यक्त केले. तानाजी जाधव यांनी स्वागत, तर मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष शिवराज काटकर यांनी प्रास्ताविक केले. कर्मवीर भाऊराव पाटील पतसंस्थेचे चेअरमन रावसाहेब पाटील यांच्या हस्ते कार्यशाळेत सहभागी झालेल्या पत्रकारांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. जिल्हाध्यक्ष कुलदीप देवकुळे यांनी आभार मानले. मोहन राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. अभिजित शिंदे, चंद्रकांत क्षीरसागर आदींनी संयोजन केले.



**सांगली : येथे बुधवारी झालेल्या 'डिजिटल माध्यमे व कायदे' या विषयावरील कार्यशाळेत बोलताना डॉ. शिवाजी जाधव.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
पुढारी

# संत तुकाराम महाराज काळाबरोबर लढत राहिले


## प्रा. नंदकुमार मोरे : करवीर नगर वाचन मंदिरमध्ये व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

माणसाचा चांगुलपणाकडे ओढा कमी, तर वाईटाकडे जास्त झाला आहे. आपल्याला जर इतरांना बदलायचे असेल तर संत तुकाराम महाराज यांचे विचार आचरणात आणले पाहिजेत. संत तुकाराम काळाबरोबर लढत राहिले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

करवीर नगर वाचन मंदिरच्या वाचक व्यासपीठच्या वतीने आयोजित संत तुकाराम आणि आजचे वर्तमान या विषयावर आयोजित व्याख्यानावेळी डॉ. मोरे बोलत होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार जोशी, कार्यवाह अश्विनी वळिवडेकर उपस्थित होत्या. चंद्रशेखर फडणीस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. वक्त्यांचा परिचय अनिल नागराळे यांनी करून दिला. शिल्पा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अश्विनी वळिवडेकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : करवीर नगर वाचन मंदिर येथे आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. नंदकुमार मोरे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
सकाळ

# 'कॅरिऑन'च्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याचे आवाहन

**कोल्हापूर :** विविध पदवी अभ्यासक्रमांच्या विशेष प्रवेश संधीसाठी (कॅरिऑन) काही विद्यार्थी पात्र ठरले आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांनी हिवाळी सत्रातील परीक्षांचे अर्ज शुक्रवारी (ता. ४) आणि शनिवारी (ता. ५) भरावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे. कॅरिऑनसाठी पात्र विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश मिळाला आहे, त्यांचे अर्ज भरून घेण्याची कार्यवाही महाविद्यालय आणि अधिविभागांनी पूर्ण करावयाची आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 OCT 2024
तरुण भारत

# विशेष प्रवेश संधी, उद्यापासून अर्ज भरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठने सर्व शाखांमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष प्रवेश संधी (कॅरीऑन) देण्याचा निर्णय नुकताच घेतला. या विद्यार्थ्यांना उद्या, शुक्रवार व शनिवारी पुढील सत्राचे अर्ज भरता येणार आहेत. याची सुविधा विद्यापीठाच्या परीक्षा विभागात उपलब्ध करून देण्यात आली असून, अर्ज भरल्यानंतर त्वरित परीक्षा शुल्कही जमा करणे आवश्यक आहे. अर्ज भरण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

03 OCT 2024
लोकमत

# उद्यापासून अर्ज भरा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठने सर्व शाखांमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष प्रवेश संधी (कॅरीऑन) देण्याचा निर्णय नुकताच घेतला. या विद्यार्थ्यांना उद्या, शुक्रवार व शनिवारी पुढील सत्राचे अर्ज भरता येणार आहेत. याची सुविधा विद्यापीठाच्या परीक्षा विभागात उपलब्ध करून देण्यात आली असून, अर्ज भरल्यानंतर त्वरित परीक्षा शुल्कही जमा करणे आवश्यक आहे. मुदतवाढ देण्यात येणार नाही. संधी देताना विद्यापीठ कायद्यातील तरतुदी, दंडक व अटी बंधनकारक असून, आवश्यक बाबींची पूर्तता होत असल्याबाबतची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य व अधिविभागप्रमुख यांची असेल.